ISSN: P-2455-0515 E- 2394-8450

Educreator Research Journal

Volume–VIII, Issues– VI
Nov – Dec 2021

Original Research Article

# नाशिक जिल्हयातील स्त्री लोकगीतातील लिंग विचारसरणी- एक अभ्यास

*डॉ.आहेर मीना ल.,*

*एस.एन.डी.टी.शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पदव्युत्तर विभाग,पुणे- ३८*

**सारांश:**

*तत्कालिन लोकांच्या विचारसरणीचा अभ्यास करायचा असेल, तर तत्कालीन साहित्याचा अभ्यास करायला हवा, आणि हा अभ्यास करण्यासाठी लोकसाहित्याची मदत होते . लोकसाहित्यात मौखिक परंपरेने चालत आलेल्या साहित्य प्रकारांचा समावेश होतो. जसे की स्त्री गीतं, पुरुष गीतं, लोककथा इ.*

*मौखिकपरंपरेने चालत आलेल्या मराठी भाषेतील स्त्री गीतांमध्ये विधी गीतांचा समावेश होतो. या विधी गीतांमधून त्यावेळेची समाज पद्धती, परंपरा, रूढी, नातेसंबंध व समाजाचा स्री व पुरुष यांच्याकडे बघण्याच्या दृष्टीकोन यांची माहिती आपणास मिळते. व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत त्याच्या आयुष्यात येणाऱ्या महत्त्वपूर्ण टप्प्यांवर आधारित विधि गीते आपणास लोकसाहित्यातील स्त्री गीतांमध्ये आढळतात. प्रस्तुत संशोधन प्रपत्रात स्त्रियांनी रचलेल्या विधी गीतांतील लिंग विचारसरणीचा अभ्यास केला आहे.*

*पदव्युत्तर स्तरावरील अग्रत समाजशास्त्र या विषयात लिंग विचारसरणी ही संकल्पना समाविष्ट केलेली असल्याने संशोधकाने आपल्या समाजाची लिंग विचारसरणी लोकासाहीत्यातून कशी व्यक्त झाली आहे हे अभ्यासण्यासाठी संबंधित संशोधन विषयाचा अभ्यास करण्याचे निश्चित केले .*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## प्रास्ताविक :-

लोकगीते ही समूहमनाची व समूहप्रतिभेची निर्मिती आहे. निसर्गाच्या लयबद्धतेशी व तालबद्धतेशी संवाद साधीतच ही गीतनिर्मिती झाली. लोकगीत निसर्गसंवादी अशी मानवाची निर्मिती आहे. लोकगीतांची निर्मिती निखळ मनोरंजनाच्या प्रेरणेतून झालेली नाही. मात्र रंजन हा सर्व कलांचा आद्य परिणाम निश्चितच आहे. लोकगीताच्या निर्मितीमागची प्रेरणा समूहमनाची असते. त्यामुळे एका अर्थाने ही निर्मिती सामाजिक ठरते. त्यातून सामूहिक जीवनाचा आविष्कार होतो.

मराठी लोकसाहित्यातही लोकगीतांची प्रदीर्घ व प्राचीन परंपरा आहे. स्त्रीगीते, जात्यावरच्या ओव्या, अंगाईगीते, डोहाळे गीते, सण उत्सवांची गाणी, खेळगाणी, नृत्यगीते ,श्रमपरिहारार्थ गायिली जाणारी भलरी गीते अशा अनेक

शाखांनी ही लोकगीत-परंपरा बहरली, समृद्ध झाली आहे.

लोकगीतांचे समीक्षक डॉक्टर चिंतामणी उपाध्याय लोक गीतांचा उगमा संबंधी म्हणतात,' ‘सुख दुख मयी भावावेश की अवस्था के चित्रण का माध्यम आशुपात दीर्घ निश्वास , पुलक और मुस्कान आदि आनुभाविक आंगिक चेष्टाओं तक ही सीमित न रहकर हर्ष और वेदना का स्वरूप धारण कर कण्ठ के द्वारा साकार हो उठता है तभी गीतों के स्वर फूट पड़ते है।ये गीत किसी कवि के नहीं व्यक्ति विशेष के नहीं अपितु सामान्य जनमानस की अज्ञात सृष्टि है।'.

जनपद अंक १ , पृ. ६५ वर डॉ. कुंज बिहारी दास म्हणतात *'The people that live in more or less primitive condition outside the sphere of sophisticated influences'( The study of Orissa folklore, p. 13)*

समाज मनाचा आविष्कार असलेल्या लोकगीतां मधील विधी गीतांतील लिंग विचारसरणीचा अभ्यास होणे आवश्यक आहे या अभ्यासातून तत्कालीन समाजातील लिंग विचारसरणीचा अभ्यास करता येईल.

**संदर्भ साहित्याचा अभ्यास :-**

लोकसाहित्याचा लीन्गभावाच्या दृष्टीने अभ्यास करण्याअगोदर पुढील लोकसाहित्य अभ्यासकांच्या योगदानाचा अभ्यास केला गेला.

**महाराष्टातील लोक साहित्याचे अभ्यासक:**

**श्री . वि. का.राजवाडे :-**

इतिहास संशोधक राजवाडे यांनी सामाजिक इतिहासाच्या दृष्टीकोनातून लोकसंस्कृतीचा/ लोकसाहित्याचा अभ्यास केला. लोकसाहित्यातील लोकगीत आणि लोककथा हे पारिभाषिक शब्द त्यांनीच प्रचलित केले. ‘सज्जनगडावरचे एक लोकगीत’ या नावाने जी टिपण लिहली आहेत त्यात त्यांनी लोकगीताचे शास्त्रीय विवेचन केले आहे. त्यांनी नीतिकथा, पोवाडे, मिथक यांचा विशेष अभ्यास केला.

**साने गुरुजी**:-

यांनी स्रीगीतांचा संग्रह केला आहे आणि तो ‘स्रीजीवन’ भाग १ व भाग २ या नावाने प्रसिद्ध आहे. साने गुरुजी यांनी स्त्री गीतांचे वर्गीकरण करून त्यांचा भावनाविष्कराच्या दृष्टीने रसपरिचय करून दिलेला आहे.

**ना.द. नांदापूरकर**

‘म-हाटी स्री रचित रामकथा’ या लोकगीतांचा संग्रह त्यांनी केला आहे. त्यात त्यांनी स्रीगीतांचा विशेष अभ्यास केला आहे.

**श्रीमती दुर्गा भागवत :-**

लोकसाहित्याला शास्र म्हणून मान्यता देण्याचे कार्य त्यांनी केले आहे .त्यांनी लोककथाचे शास्रीय विवेचन केले आहे.

**र.चिं.ढेरे**

यांनी  धर्माच्या अंगाने लोकसाहित्याचा अभ्यास केला आहे.

सरोजिनी बाबर यांनी स्रीगीताचा सामाजिक व वाङ:मयीन अभ्यास केला आहे. यांनी लोकसाहित्याच्या संकलनाला जास्त महत्त्व दिले आहे.

**प्रभाकर मांडे**

यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाला चालना देणारी चळवळ उभी केली.विधीनाटयाचे विवेचन केले.

**गंगाधर मोरजे**

यांनी लोकसाहित्याचा अभ्यास जागतिक पातळीवर पोहचवला. लोकसाहित्य आणि इतिहास यांच्या परस्पर संबंधावर त्यांनी अभ्यास केला आहे.

**मझुमदार परमानंद दास यांनी**, ' Globalization and its impact on folklore of bodos'. (**२०२१)**

संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे जाणवते की, विधी गीतांचा लिंग विचारसरणीच्या संदर्भात अभ्यास झालेला  नाही.जी संशोधने झालेली आहेत ती लोकसाहित्याचे साहित्यिक मूल्य या दृष्टीकोनातून झालेली आहेत . शिक्षणशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकसाहित्यातील कोणत्याही प्रकारावर संशोधन झाल्याचे  निदर्शनास आले नाही.

शीर्षक : नाशिक जिल्ह्यातील स्त्री लोकगीतातील लिंग विचारसरणी- एक अभ्यास

**प्रस्तुत संशोधनाची उद्धीष्टे :-**

- नाशिक जिल्ह्यातील विधी गीतांचे संकलन करणे.
- विधी गीतांचे लिंग विचारसरणीच्या संदर्भात विश्लेषण करणे.

**कार्यात्मक व्याख्या :**

नाशिक जिल्हा :- महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा .

स्त्री गीत :- जन्म, विवाह व मृत्यू या प्रसंगी केल्या जाणाऱ्या विधींवर आधारित स्रीयांकडून जात्यावर गायिल्या जाणारी ,त्यांची  स्वरचना असलेली, मौखिकरित्या एका पिढी कडून दुस-या पिढीकडे संक्रमित होणारी पण अनाम असलेली गीतं म्हणजे स्त्री गीतं.

लिंग विचारसरणी: पुरुषाच्या ठिकाणी असलेला पौरुषत्वाचा ( अधिपत्याचा ) भाव व स्रीच्या ठिकाणी स्रीत्वाचा(गौणत्वाचा) भाव.तसेच स्री- पुरुष या संबंधीच्या सामाजिक श्रद्धा व सामाजिक स्तरिकरण म्हणजे लिंग विचारसरणी

लिंग विचारसरणी :-

**Gender ideology refers to attitudes regarding the appropriate roles, rights and responsibilities of men** and women in society. Traditional gender ideologies emphasize the value of distinctive roles for women and men where men fulfill their family roles through breadwinning activities and women fulfill their roles through homemaker and parenting activities.

Gender ideology also refers to societal beliefs that legitimate gender inequality. Gender ideology is not a variable that ranges from liberal to conservative instead it refers to specific type of belief those that support gender stratification.

**http://www.sociologyguide.com/gender/gender-ideology.php**

**अभ्यास :** जन्म , विवाह आणि मृत्यू या प्रसंगी होणा-या विधींवर आधारित स्रियांकडून जात्यावर गायिल्या जाणा-या गीतांचे स्री- पुरुषाचे समाजातील स्थान, नातेसंबंध ,भूमिका, कर्तव्य या संदर्भात विश्लेषण म्हणजे अभ्यास.

**संशोधनाची व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधन महाराष्टातील नाशिक जिल्ह्यातील विधी गीतांतील व्यक्तीच्या जीवनातील विविध टप्प्यांवर आधारित असलेल्या जात्यावर दळताना स्त्रियांकडून गायल्या जाणाऱ्या विधी गीतांचा विचार केला आहे .

प्रस्तुत संशोधनात :- प्रस्तुत संशोधनात विधी गीतांतील तत्कालीन सामाजातील लिंग विचारसरणीचा विचार केला आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

-स्रीयांनी दिलेल्या प्रतीसादावर विधि गीतांचे संकलन अवलंबून आहे .

- प्रस्तुत संशोधनात जन्म. विवाह आणि मृत्यू प्रसंगी केल्या जाणा-या विधींवर आधारित जात्यावर दळताना स्त्रियांनी गायिलेल्या विधि गीतांचाच अभ्यास केलेला आहे.

-प्रस्तुत संशोधनात विधी गीतांतील तत्कालीन सामाजातील लिंग विचारसरणीचाच विचार केला आहे.

**संशोधनाची परिमर्यादा : -**

-प्रस्तुत संशोधनात फक्त नाशिक जिल्ह्यातील सातपूर आणि बेलगाव ढगा या दोन गावांतील लोकसाहित्यातील विधी गीतांचा विचार केला आहे.( औद्योगिक वासाहीतीतील लोकांचा विचार केलेला नाही)

-प्रस्तुत संशोधनात जन्म , विवाह, मृत्यू या जीवनातील टप्प्यांवर आधारित विधी गीतांचा अभ्यास केलेला आहे.

**प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण :-**

आत्ता पर्यंत झालेल्या संशोधनात सामाजिक इतिहासाच्या दृष्टीकोनातून लोकसंस्कृतीचा/ लोकसाहित्याचा अभ्यास केला आहे. नीतिकथा, पोवाडे, मिथक यांचा विशेष अभ्यास केला आहे . पण स्री- गीतांचा लिंग विचार सरणीच्या दृष्टीने अभ्यास झालेला नाही. हे या संशोधनाचे वेगळेपण आहे.

**प्रस्तुत संशोधनाची पद्धती:-**

प्रस्तुत संशोधनात स्री-गीतांचे संकलन करण्यासाठी क्षेत्रीय तसेच स्तरीय पद्धतींचा उपयोग केला गेला;

**संशोधनाची क्षेत्रीय पद्धत :**

लोकसाहित्याच्या संकलनासाठी क्षेत्रीय पद्धतीचा अवलंब करून संकलन करणे हे विशेष महत्त्वाचे आहे. संशोधनाच्या या पद्धतीत क्षेत्राला विशेष स्थान असते . प्रस्तुत संशोधनात नाशिक जिल्ह्यातील सातपूर, बेलगांव ढगा, गावांची निवड केली आहे. शेती, शेत कामगार, व्यापारीवर्ग या तीन सामाजीक स्तरांत ही गावं विभागलेली आहे .

सातपूर हे गाव नंदिनी नदीच्या तीरावर वसलेले आहे. या गावात भव्य महादेवाचे व हनुमानाचे मंदिर आहे. सातवाहनांची वसाहत असलेल्या सातपूरला गुढीपाडव्यांलाच यात्रा भरते. ही परंपरा दोन हजार वर्षांपासून चालत आली असावी,

बेलगाव ढगा हे गाव हेमाडपंती मंदिराच्या अवशेषांना सोबत घेत अख्यायिकांनी भरलेले अन् पेशवाईच्या जहागिरीचे तीन मारूतींचे गाव नंदिनीचे उगमस्थान म्हणूनही ओळखले जाते. बेलगाव ढगा फक्त निसर्गरम्यच नाही, तर ऐतिहासिक व अनोखेही आहे.

**संशोधनाची स्तरीय पद्धती:-**

लोकसाहित्याच्या संकलनपद्धतीत लोकसमूहाचे स्तर किंवा लोकसाहित्याचे अंतर्गत घटक लक्षात घेऊन संकलन करता येते. प्रस्तुत संशोधनासाठी स्रीगीते हा घटक लक्षात घेतला आहे.

**उद्दिष्ट क्रमांक १ - नाशिक जिल्ह्यातील विधी गीतांचे संकलन करणे.**

या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी लोकसाहित्याचे प्रत्यक्ष संकलन :-

लोकसाहित्यातील स्रीगीतांचे संकलन हे सातपूर व बेलगाव ढगा या गावांतील मूळ रहिवासी असलेल्या ५० अशिक्षित स्रीयांना भेटून केले गेले. संकलीत माहितीचे गुणात्मक पद्धतीने विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले

गेले.

**उद्दिष्ट क्रमांक १ - विधी गीतांचे लिंग विचारसरणीच्या संदर्भात विश्लेषण करणे. या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी स्री गीतांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले :-**

स्री गीतांमध्ये तिच्या जन्म, लग्न आणि मृत्यू या तीन प्रसंगांच्या वेळी केलेली भावनाभिव्यक्ती विचारात घेतली आहे. तिच्या मनातील आपण स्री आहोत ही लिंग विचारसरणी समाजाने तिच्यावर ठसावली आहे आणि तिने ही ती स्वीकारली आहे. प्रत्येक गीतातून ती दिसते.

**जन्म प्रसंगीच्या गीतांतील लिंग विचारसरणी:-**

जन्म मग तो मुलीचा असो वा मुलाचा त्याचे स्वागतच व्हायला हवे; पण विधीगीते अभ्यासताना त्याचा प्रत्यय येत नाही .मुलगी जन्माच्या स्वागताचे विधी गीत आढळत नाहीत.पण मुलाच्या जन्माचे स्वागत गीते मात्र आढळतात .-

लेकीचा जलम नको घालू देवराया |

मायबाई हरणीचं , केलं कष्ट गेलं वाया ||

जन्माला का ग आली मैना ,

होईल तुझ्या जीवाची ग दैना

जन्मा आला ल्योक आता तुला काय उण |

सात जन्माच फळा आलं पुण्य ||

किती गान गाऊ बाळ माझं गाण्याजोग

वा-याने हलती याच मंदिलाच सोग ||

बाळाला माझ्या नका म्हणू पोरा पोरा

सोन्याला माझ्या जवळ जाऊन हाका मारा ||

**विवाह प्रसंगीच्या गीतांतील लिंग विचारसरणी:-**

भारतीय संस्कृतीत विवाह हा संस्कार मानला जातो; या प्रसंगी केल्या जाणाऱ्या विधीतून वधु आणि वर या दोघांवरही संस्कार केले जातात. या संस्कार विधीच्या वेळी जात्यावर गायिल्या जाणाऱ्या गीतांतून वधु पक्ष आणि वर पक्षाची भूमिका अनुभवायास मिळते आणि त्यातूनच तत्कालीन समाजाच्या लिंग विचारसारणी अभ्यास करता येतो .

नव-या मुलाला हुंडा देण्याची प्रथा होती. हेच पुढीलविधी गीतातून जाणवते .हुंड्यात शेत दिलंजात असाव;-

जावयाला दिला पान मळा पान खाया , कळशी दिली पाणी वहाया

जावई खातो पाच पानाचा वीडा एक, नका टोचून बोलून मी गरीबाची लेक.

जी स्त्री मुलाला जन्म देते तिला समाजात आपोआपच महत्त्व प्राप्त होताना दिसते. विवाह प्रसंगीच्या जात्यावरील ओव्यांमधून त्याचा प्रत्यय येतो. विवाह प्रसंगी नव-या मुलाच्या आईला नवरी मुलीच्या आईपेक्षा जास्तच मान असतोच त्याचबरोबर त्याच्या नात्यातील सर्वच लोकाना माना दिला जातो .

मांडवाच्या दारी दुरडी सुकली पानाची ,

वरमाई रुसली मानाची ||

किंवा

वरमाई झाले माझे व्हयाचे वखत, एवढं कौतुक नाना बाईच्या देखत,

वारमाय झाले लेका आधी पुतण्याची

शेंडीचा नारळ वटी माझी सकणाची( हक्काची)

वरमाई झालेले लेकी आधी धाडीची (पुतणी)

पैठणी पातळ वटी हिरव्या साडीची

वरमाई झाले दोन्ही कुळाला आनंद, शेंडीचा नारळ वटी भरती ननंद,

नेणती वरमाई राजा भिती झोपी जाई.

भाग्याची माझी बाई संग हिच्या नाना बाई

नव-या मुलाच्या नात्यातील स्री -पुरुषांनाच नव्हे तर जनावरांनाही मान प्राप्त होतो त्यांचेही लाड केले जावेत अशी मागणी केली जाते

याह्या माझ्या दादा विहिन तुझे नाल, माझ्या बैलाला निळ्या नागिनीचा वेल

नागिनीचा वेल बैल माझे नाही खाती

सांगा सोयऱ्याला आणा मळ्यातील मेथी

मळ्यातील मेथी बैलाला ग कडू सांगावा सोयी-याला ऊसाचा उंडगा मोडू

ऊसाचा ऊंडगा माझ्या बैलाला चालना, सांगावा सोयि ऱ्याला आणा बांधाचा पवण्या ( गवत )

बांधाचा पळवण्या माझ्या बैलाला मऊ

सांगावा सोयि-याला आणा जंगलपुरे गहू

जंगल पुरे गहू माझ्या बैलाला पुराणा

सांगावा सोयऱ्याला आणा पाण्याचा किराणा

वाण्याच्या किराण्याने बैले झाले धुंद

व्याही माझा ऐनेदार माझा पुरविला छंद

याउलट नव-या मुलाकडील कोणत्याही व्यक्तीला काही कमी पडू नये यासाठी नवरीच्या वडिलांची चाललेली धडपड आणि समाजमान्यतेनुसार त्याना आलेली दुय्यम भूमिका,ही भूमिका निभावताना त्यांची झालेली दमछाक यातून समाजाची लिंग विचारसरणी किती असमानतेची आहे याचा प्रत्यय येतो .

नवरीचा बाप मांडव घालून थकला ,

नव-याचा बाप गाडी बैलाशी सजला ||

नव-याचा बाप नेसे करवंदी काठ  धोतर,

नवरीचा बाप विनवण्या करी बारबार ||

लग्न विधीच्या वेळी नारीच्या आईची अवस्था अतिशय केविलवाणी झालेली दिसते :-

मांडवाच्या दरी आईचा जीव कासावीस |

मैना ग बाई माझे दोन घडी जवळ बैस

किंवा

लेक चालली नांदायला

आईची येडी माया

दूर गेली घालवाया ||

नवरी मुलीच्यावडिलांकडेच नव्हे तर सर्वच नातेवाईकांकडे दुय्यम भूमिका येते

मांडवाच्या दारी भाऊमाझा वाढी भाजी,

गोताला जोडी हात दुबळी बहीण माझी ||

मांडवाच्या दरी बुडता आहेर कुणाचा ,

नवरीचा मामा वात चालतो उन्हाचा ||

मांडवाच्या दारी ब्राह्मण बोलतो मंगळ,

जन्म लेकीचा वंगाळ ||

तत्कालीन समाजात द्वीभार्या करण्याला समाज मान्यता होती म्हणूनच सवतीवर मुलगी देणाऱ्या बापाचा उल्लेख आढळतो :

लेकीचा जल्म जशी तांदुळाची गोणी ।

बाप विकून झाले वाणी ।।

विवाह प्रसंगी फक्त नवरीलाच केलेल्या उपदेशांची गीत आढळतात :-

सासू सास-याची सेवा करावी आदरानं |

माझी तू बाळाबाई , पाय पुसावं पदरानं ||

सासरच्यांनी कितीही त्रास दिला तरी तिथेच रहाव असा उपदेश बाप देतो

बाप म्हणे लेली जन्मता मरावा |

सोय-या धाय-यात नाव नाडून करावा ||

मृत्यू प्रसंगीची विधी गीत :-

स्री मृत्यू प्रसंगीची विधी गीत आहेत . स्री च्या मनावर समाजपुरुषाने हे बिंबवले आहे की स्रीच अस्तित्व पुरुषांशिवाय नाही त्यमुळे तिचा मृत्यूही नव-याच्या अगोदर झाला तरच तिच्या जन्माच सार्थक होईल अशी तिची मनोभूमिकाच बनवली गेली आहे आणि त्यातच ती धन्यता मानताना दिसते.

अहेव मरणाची बाई भारीच मौज ,

पुढे चाले कंथ( नवरा ) ,

मागे गोताची फौज,

अहेव मेली नार ,

आकाश झाल लालेलाल ,

तिच्या मरणाचं दु:ख एकल्या माउलीलाच.

आपली मुलगी निर्वतली याच दु:ख फक्त तिच्या आईलाच होत. मृत मुलीचा नवरा मात्र मनात म्हणतो :-

अहेव मेली नार कांत रडतो वसरी

मनाला देतो धीर उद्या करील दुसरी||

**समारोप :-** जन्म ,विवाह आणि मृत्यू या जीवनातील टप्प्यांवर आधारीत स्रीयांकडून जात्यावर दळताना गायिल्या जाणा-या विधी गीतांमध्ये आढळून आलेल्या लिंग विचारसारणीचा विचार केला आहे . स्री च्या मनावर समाज पुरुषाने तीचे अस्थित्व पुरुषाच्या संदर्भातच आहे हे बिबवले आहे याचा प्रत्यय येतो . तिचं जगणं , तिची विचार करण्याची पद्धत आपण बाई आहोत या लिंग विचारसरणीच्या चौकटीत घिरट्या घालताना दिसते.

**निष्कर्ष :**

नाशिक जिल्ह्यातील सातपूर आणि बेलगाव ढगा या गावातील जन्म, विवाह आणि मृत्यू या प्रसंगावरील विधी गीतांतील लिंग विचारसरणीचा अभ्यास केला असता पुढील निष्कर्ष निघाले :

- जन्म प्रसंगीच्या विधी गीतांमध्ये मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाते ;पण मुलगी जन्मलाच यायला नको अशीच भावना व्यक्त होताना दिसतात .म्हणजेच जन्म प्रसंगीच्या विधी गीतांमधील लिंग विचारसरणी ही स्री- पुरुष असमानतेची आहे असे आपण म्हणू शकतो.

- विवाह प्रसंगीच्या विधी गीतांतील लिंग विचारसरणी अभ्यासताना असे जाणवले कि वर पक्षाचा वरचष्मा असलेला दिसतो.

सासरी नांदतानाच्या गीतांतील लिंग विचारसरणी अभ्यासताना असे जाणवले कि सासरी मुलगी इतरांच्या सेवेसाठीच असते तिचं स्वत:च असं काहीच अस्तित्व नसतं.हे विचार समाजाने पिढ्यानपिढ्या तिच्यावर लादले असल्याचे जाणवते. म्हणजे विवाह प्रसंगीच्या विधी गीतांमध्येही स्री- पुरुष असमानतेची विचारसरणी असल्याचे आढळून आले .

मृत्यू प्रसंगातील गीतातून दिसून येणारा लिंगविचारसरणी अभ्यासताना असे जाणवले कि मुलीच्या आईलाच तिच्या मृत्यूने दु: होते . बाकी तिचं जगणं आणि मरण याच कोणालाही सोयरसुतक नाही हे तिलाही माहित झालेले आहे आणि ते वास्तव ती अहेवपणाच्या मुलाम्याखाली स्वीकारते. म्हणजेच मृत्यू प्रसंगीच्या विधी गीतांमध्येही स्री- पुरुष असमानतेची विचारसरणी असल्याचे आढळून आले .

**संदर्भ साहित्य :-**

पाटील, सुमन (२००८).मराठी-कानडी सीमाप्रदेशातील लोकसाहित्य औरंगाबाद : गोदावरी प्रकाशन

ढेरे, रामचंद्र चिंतामणी (१९७८). संत साहित्य आणि लोकसाहित्य पुणे: श्रीविद्या प्रकाशन

व्यवहारे, विद्या (२००२). लोकसाहित्य लोकसंस्कृती प्रतिमा प्रकाशन: जळगाव

Babar, Srojini (1968). Folk literature of Maharashtra New Delhi : Maharashtra Information centre

Bhagvat, Durga (1958) . An outline of folklore Bombay: popular Book Depot

http://www.sociologyguide.com/gender/gender-ideology.php

https://www.jstor.org/stable/42931206

http://www.marathimati.net/chaliriti-parampara-sarojini-babar/

***Cite This Article:***

***डॉ..आहेर मीना ल.,(2021). नाशिक जिल्ह्यातील स्त्री लोकगीतातील लिंग विचारसरणी- एक अभ्यास,*** *Educreator Research Journal VIII (VI),84-93.*